१५. शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता **स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा /दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा** दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

१६. महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

१७. महाराष्ट्र स्वंयअथसहय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या नियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **U-Dise** मध्ये माहिती भरताना स्वंय अर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील. १८.शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

**इतर अटी :**

जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१. शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी

२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येंवू नयेत

३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यांत यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदार शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, यांची राहील.

५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

६. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकष, शर्ती, अटी यांच्या पूर्ततेसह शाळेस इमारत व भौतिक सुधारणा करणे बंधनकारक राहील.

७. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम २००९ व नियम २०१६ चे पालन करणे बंधनकारक आहे.

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तीची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी.

16.03.2020

(डॉ.गणपत मोरे)

शिक्षण विभाग माध्यमिक

पुणे जिल्हा परिषद पुणे

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

१. मुख्याध्यापक, **हेरिटेज इंटरनॅशनल स्कुल, कासार आंबोली ता. मुळशी**

२. विभागीय सचिव, पुणे विभागीय शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे.

**प्रत : माहितीसाठी सविनय सादर**

१. मा.अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.

२. मा. उपसंचालक पुणे विभाग पुणे

**शिक्षण विभाग माध्यमिक**
**यशवंतराव चव्हाण भवन (जुनी इमारत)**
**पुणे जिल्हा परिषद पुणे सोमवार पेठ पुणे ०१**

कार्या दुरध्वनी-०२०-२६०५०७३३ मेल आयडी- rmsapunezp@gmail

---

जाक्र.जिप/शिक्षण/माध्य/ ३३७८ /२०२० दि. ७ /१२/२०२०
परवानगी वर्ष-२०१७-२०१८
परवानगी प्रकार-दर्जावाढ **कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी प्राप्त शाळा**
शाळा सुरु वर्ष-२०१९-२०२० **प्रथम मान्यता**

**प्रति,**

१. अध्यक्ष/सचिव ज्ञानदिप शिक्षण संस्था, कासार आंबोली ता. मुळशी
२. मुख्याध्यापक, हेरीटेज इंटरनॅशनल स्कुल ,कासार आंबोली ता. मुळशी

**विषय- स्वयंअर्थसहायित तत्वावर नवीन शाळेस प्रथम मान्यता देणेबाबत (९ वी व १० वी ).**

संदर्भ-१.माध्यमिक शाळा संहिता आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा स्थापना व विनियम अधिनियम-२०१२ .
२.शासन निर्णय क्र एसएफएस-२०१६/प्रक्र १४२/एसएम-२ दि.१४ जुलै २०१७.
३.शिक्षण उपसंचालक पुणे यांचेकडील पत्र जाक्र उमाशि-४०१/पुवि/१३७० दि.१२/०२/२०२०.
४.शासन निर्णय क्र एसएफएस-२०१७/प्रक्र.१६९/एय.एय-२ दि.०६/०५/२०१७.
५.संबंधित शाळेकडील प्रस्ताव **दिनांक ६/१०/२०२०**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की आपल्या संस्थेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा स्थापना व विनियमन अधिनियम -२०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणेस विदयमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी संदर्भ क्र ४ अन्वये शासन परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार विहित कालावधीत वर्ग सुरु करुन त्यांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव आपण संदर्भ क्र .५ अन्वये या कार्यालयास सादर करण्यात आलेला होता आपले प्रस्तावानुसार शाळेने पुढीलप्रमाणे वर्ग सुरु केलेले असून सदर वर्गाना खाली नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन निर्णय यादीतील क्रमांक | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | माध्यम | शिक्षण मंडळ | मान्यता वर्ग इय-ता व शाखा | मान्यता वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शा.नि. दिनांक प्रक्र.५८ /एसएम-२दि.३/३/१४ | ज्ञानदिप शिक्षण संस्था कासार आंबोली ता. मुळशी | हेरिटेज इंटरनॅशनल स्कुल ,कासार आंबोली ता. मुळशी | इंग्रजी | सीबीएसइ | इ. ९ वी व १० वी च्या वर्गास नैसर्गिक वाढ मिळणे | २०१९-२०२० ते २०२३-२०२४ | पाच वर्षासाठी |

**अटी व शर्ती**

१.सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदीची व त्या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या सर्व नियमांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२.परवानगी देण्यात आलेल्या शाळेस,(अ) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच (ब)महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा स्थापना व विनियमन अधिनियम २०१२ मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

३. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम , शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी व मान्यता आपोआप रद् समजण्यात येईल

४.U-Dise (Unified District Information System for Education ) यु-डाईस कोड प्राप्त करुन घेणे व दरवर्षी त्यामधील माहिती अदयावत करणेची जबाबदारी संबंधित संस्था/शाळेची राहील.